शिक्षणतज्ज्ञ : गिज्जुभाई बधेका

- श्री. विजयकुमार पाईकराव, नाशिक, संपर्क ९४०३७७४५२९

पूर्वप्राथमिक शिक्षणाचे अग्रणी प्रयोगकर्ता गिज्जुभाई बधेका यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८८५ मध्ये गुजरातमधील सौराष्ट्रातील चितलगाव येथे झाला. त्यांचे संपूर्ण नाव श्री. गिरीजाशंकर भगवानजी बधेका होते. त्यांच्या आईचे नाव श्रीम. कसीबा होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण वाला येथे झाले आणि ते भावनगर येथून १९०५ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर श्यामलाल महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला, परंतु १९०७ मध्ये त्यांनी अर्धवट शिक्षणाला रामराम केला. आणि जीवनचरितार्थाकरिता नोकरीसाठी त्यांना पूर्व आफ्रिकेत जावे लागले. १९१० मध्ये ते पूर्व आफ्रिकेतून पुन्हा मुंबई येथे आले व मुंबई विद्यापीठातून १९११ साली कायद्याचे शिक्षण पूर्ण करून जिल्हा न्यायालयात आणि १९१२ साली मुंबई उच्च न्यायालयात त्यांनी वकिली सुरू केली. त्यांची पहिली पत्नी श्रीम.हिराबेनचे १९०२ साली निधन झाले. त्यानंतर त्यांनी १९०६ मध्ये श्रीमती जेदीबेन ह्यांचे सोबत त्यांनी दुसरा विवाह केला. त्यांचे काका श्री. हरगोविंद पांड्या यांचा गिज्जुभाईंच्या व्यक्तिमत्त्वावर जास्त प्रभाव होता. त्यांनी गिज्जुभाईला विचार आणि चारित्र्याचे संस्कार दिले. त्यांच्यावर प्रभाव पडणारे दुसरे व्यक्तिमत्त्व एस.पी.एटीबेन्स होत. त्यांचेसोबत पूर्व आफ्रिकेत गिज्जुभाईंनी कार्य केले होते. त्यांच्याकडून ते आत्मनिर्भरता आणि आत्मसहायता आचार, विचार शिकले.

१९१३ साली त्यांना पहिले पुत्ररत्न प्राप्त झाले. त्याच्या शिक्षणाची काळजी म्हणून त्यांचा प्राथमिक शिक्षणाशी जवळून संपर्क झाला. त्या वेळी त्यांना श्री. मातीभाई अमीनसोबत गुजराती भाषेतील मॉण्टेसरी शिक्षणपद्धती विधीवर आधारित पुस्तक लिहिले. या कार्यानंदामुळे ते बालशिक्षणाकडे कायमचे आकर्षित झाले. त्याचबरोबर १९१५ मध्ये त्यांनी दक्षिणामूर्तीच्या स्थापनेत सहयोग दिला आणि भावनगर येथे एक वसतिगृह सुरू केले. १९१६ मध्ये त्यांनी वकिली व्यवसायास कायमचा रामराम ठोकला, आणि दक्षिणामूर्तीचे सहसंचालक म्हणून कार्यास सुरुवात केली.

तत्कालीन दक्षिणामूर्तीचे संचालक श्री. नानाभाई भट्ट यांचे लक्ष शिक्षणविषयक अनियमितता, अव्यवस्थेकडे वळविले. या शैक्षणिक अव्यवस्थेला दूर करण्यासाठी त्यांच्याकडे दक्षिणामूर्तीचे आचार्यपदाची जबाबदारी देण्यात आली. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, प्राथमिक शिक्षणाची सुरुवात बरीच अगोदर व्हावयास हवी. या विचारामुळे त्यांनी १९२० ला दक्षिणमूर्ती बालमंदिर नावांनी पहिले पूर्वप्राथमिक विद्यालय स्थापन केले. त्यानंतर त्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी अनेक ठिकाणी विद्यालय स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या शिक्षक प्रशिक्षणासाठी त्यांनी १९२५ मध्ये दक्षिणामूर्तीमध्ये पहिले पूर्वप्राथमिक शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय सुरू केले. प्रशिक्षित अध्यापक तयार व्हावेत म्हणून, त्याचबरोबर गिज्जुभाईंनी बाल साहित्यावर छोट्या-छोट्या कथा, कविता, प्रवास वर्णन, शैक्षणिक संस्कारकथा, इत्यादी लेखन केले. त्यानंतर इतर अनेक भारतीय भाषेत त्यांच्या लेखनाचे भाषांतर झाले. याच सुमारास त्यांची महाराष्ट्रातील श्रीम.ताराबाई मोडकांशी भेट झाली. त्यांच्या सहका-यांनी 'शिक्षणपत्रिका'नावाचे गुजराती मासिक

संपादित करण्यास सुरुवात केली. या मासिकातील सुस्पष्ट व निर्भीड विचारामुळे संपूर्ण गुजराती शिक्षण क्षेत्रात वैचारिक घुसळण निर्माण झाली. इ. १९२५ मध्ये भावनगर आणि इ. १९२८ मध्ये अहमदाबाद शहरात बालशिक्षक जागृतीसाठी संमेलनांचे आयोजन केले. याच काळात गिज्जुभाईंनी दक्षिणामूर्तीमध्ये दलितांना प्रवेशाची अनुमती प्रदान केली. बारडोली सत्याग्रहात घर सोडून गेलेल्या शेतकरी कुटुंबांच्या पुनर्वसनासाठीही त्यांनी कार्ये केले. याच सुमारास बाल सत्याग्रहाची वानरसेना नावाची तुकडी तयार केली. त्या तुकडीने १९३० च्या आंदोलनात तत्कालीन सरकारच्या नाकीनऊ आणले. १९३० मध्येच गिज्जुभाईंनी प्रौढ शिक्षणाचेही संचालन सुरू केले. दुर्भाग्यवश १९३६ साली वैचारिक मतभेदामुळे त्यांनी दक्षिणामूर्तीला सोडचिठ्ठी दिली. त्यानंतर राजकोट येथे अध्यापन मंदिर व अध्यापक प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली. निरंतर कठोर मेहनत, परिश्रमामुळे त्यांची प्रकृती बिघडली आणि इ. २३ जून १९३९ रोजी त्यांचे निधन झाले. बालकांप्रति त्यांचे अगाध प्रेम होते. सर्व बालके त्यांना मिशावाली आई म्हणून ही संबोधित असत.

गिज्जुभाई बधेकांचे शैक्षणिक विचार कार्ये -

गिज्जुभाईंच्या बालसाहित्य संदर्भातील सृजनात्मक रचना आणि शैक्षणिक प्रयोगावर दृष्टिक्षेप टाकल्यास आपल्याला स्पष्ट होते की, त्यांचे पूर्वप्राथमिक आणि बाल मानसशास्त्रासंदर्भातील विस्तृत ज्ञान होते. हे दिवास्वप्न नावाच्या मासिक ग्रंथाद्वारे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. त्यांचे मुख्य शैक्षणिक विचार पुढीलप्रमाणे

बालकजगत (बालविश्व) : गिज्जुभाईंनी आपले मासिक 'शिक्षण पत्रिकेत' बालजगताची कल्पना मांडली आहे. १. बालकांच्या खुशीत स्वर्ग आहे. २. बालकांच्या सुदृढतेतही स्वर्ग आहे. ३. बालकांच्या आनंदामध्ये स्वर्ग आहे. ४. बालकांच्या खेळात स्वर्ग आहे. ५. बालकांच्या गाण्यात, आणि हास्यविनोदात स्वर्ग आहे.

वरील विचारांमुळेच त्यांनी पूर्वप्राथमिक विद्यालयाला बालकमंदिर असे नाव दिले. जेथे बालकांकडे संपूर्णपणे लक्ष दिले जाई, असे बालकमंदिर. ते बालकेंद्रित शिक्षणाचे पुरस्कर्ते होते.

गिज्जुभाईंची शिक्षणविषयक मुख्य तत्त्वे -

१. शिक्षण बालककेंद्रित असावे.
२. बालकाची पवित्रता आणि अखंडता अबाधित राखावी.
३. अध्ययन-अध्यापनात बालकाचा जास्तीत जास्त सहभाग असावा.
४. बालकाला स्वास्थ्यपूर्ण वातावरण प्रदान करावे.
५. विद्यालयातील वातावरण प्रेमपूर्वक आणि बालकांना समजून घेऊन करण्यात यावे.
६. बालक सजीवतापूर्वक शिकेल हे पाहावे.
७. बालक कृती करून शिकेल हे पाहावे.

गिज्जुभाईंनी आपल्या विचारांचे वर्णन १९३१ मध्ये लिहिलेल्या 'दिवास्वप्न' या गुजराती भाषेतील ग्रंथातही केले आहे. हे पुस्तक गोष्टीरूपात लिहिले आहे. या पुस्तकात त्यांनी प्राथमिक शिक्षणाच्या विविध पैलूंवर अनुभव व अभ्यासपूर्ण प्रकाश टाकलेला आहे.

शिक्षण विधी :

गिज्जुभाईंनी आपली पुस्तके प्राथमिक शाळेत भाषा शिक्षण आणि दिवास्वप्न या दोन्ही पुस्तकात शिक्षण विधी संदर्भात महत्त्वपूर्ण वर्णन केले आहे. भाषा शिक्षणात सर्वात प्रथम वाचन, त्यानंतर रेखाचित्रणवरून लेखन. श्रुतलेखनावरून गतीनुसार व एकूण शुद्धलेखनाची सवय विकसित केली जाते. कवितेचे शिक्षण लोकगीते, किंवा ग्रामगीतांच्या माध्यमातून गेयता, ताल, डोल, आदींच्या सहकार्यांनी व्हावे. कवितेच्या शिक्षणात बालकांना शब्दाचे अर्थ लिहिण्यास सांगू नयेत, किंवा त्यांना शब्दांचे अर्थ विचारू नयेत, सांगू नयेत. कवितेच्या शिक्षणाचे रहस्य

म्हणजे बालक काव्यात किती रस घेतो ते आहे.

व्याकरणाचे शिक्षण स्वतंत्र रूपात किंवा वर्गीकरण करून देण्याचे कार्य नाही. जे सर्वसामान्यपणे अध्यापक शिकवतात. ते 'दिवास्वप्न' पुस्तकामध्ये स्पष्ट लिहितात. माझ्या मते व्याकरणाचे शिक्षण मोठ्या वयाच्या विद्यार्थ्यांनाच उपयुक्त होऊ शकते. जे भाषा शिक्षणात रुची घेत आहेत. प्राथमिक शाळेत तर व्याकरण शिक्षणविषय काढूनच टाकावा. व्याकरण शिक्षणासंदर्भात ते असेही म्हणतात की, व्याख्या, संज्ञा, यांमध्ये न पडता प्रथम खेळविधीतून परिचय करावा. आणि हळूहळू शास्त्रीय परिभाषा, संज्ञांची ओळख करून द्यावी. इतिहास शिक्षण कथेच्या, कहाणीच्या स्वरूपातच शिकवले पाहिजे. त्यास सोबत मूळ घटनेच्या आसपास एखादी कल्पित घटना सजवून कहाणी तयार करून इतिहास शिकवावा.

भूगोल शिक्षणात पृथ्वीगोल व नकाशांच्या साहाय्यांनी तथ्य प्रस्तुत करावेत. गणित शिक्षणासाठी गिज्जुभाई मॉण्टेसरी पद्धतीच चांगली समजतात. चित्रकला शिक्षणात बालकाला वस्तूंची नावे व त्याच्या आकृती काढण्यास, बनवण्यास सांगतात. सुरुवातीला विद्यार्थी जरी सुंदर चित्रे काढू शकला नाही तरी पुढे तो चांगली चित्रे काढेल. बालकाला खेळविधीद्वारे जास्तीजास्त कार्य करावयास सांगावे. त्यामुळे मुले आनंदाने शिकतील. असे 'दिवास्वप्न' पुस्तकात लिहितात. खेळ खेळताना मुलाला आनंद होतो. त्यामुळे थोडा वेळ वाया गेला तरी हरकत नाही. त्यामुळे परिणाम चांगले आणि टिकाऊ स्वरूपात होतील. गिज्जुभाई नाटक विधीलाही अध्ययन-अध्यापनात सामील करण्याचा आग्रह धरतात. बालकांचे डोळे उघडे असतात. शिंपी, कुभार, सुतार या सर्वांना पाहतात, ते प्राणी मात्रांना पाहतात, त्यांचे आवाज ऐकतात, कथेत त्यांचे वर्णन करतात ते ही ऐकतात. ईश्वरांनी याकरिता त्यांना कल्पनाशक्ती दिली आहे. अनुभव आणि कल्पनेचा अंतर्गत मेळ घालून अभिनय करता यावा म्हणून.

विद्यार्थी - गिज्जुभाई विद्यार्थ्यांला सामाजिक विश्व व शिक्षण विश्वाचा केंद्रबिंदू मानतात. दिवास्वप्नात ते म्हणतात. 'बालक एक पूर्ण व्यक्ती आहे. त्याला बुद्धी, भावना, समज आणि विचार आहेत. त्याला आपली कमजोरी आवड-निवड आहे. आम्ही बालकाची भावना समजून घेतली पाहिजे' ते एका ठिकाणी म्हणतात. 'बालक, बालक आहे तो प्रौढ नाही' ते बालकाला आपल्या स्वगतीने विकास करताना पाहू इच्छित होते. ते बालकाला प्रकृतीच्या कुशीत पल्लवित होताना, फुलताना पाहणे अधिक पसंत करत. यामध्ये वडीलधा-या मंडळीचा कमीत-कमी हस्तक्षेप असावा असे ते म्हणत. आपली रचना 'बालदर्शन' मध्ये ते म्हणतात. 'बालकाला स्वत: काम करण्याचा शौक असतो. त्याला रुमाल धुऊ द्या, पाण्याचा पेला भरू द्या. त्याला भांडी स्वच्छ करू द्या. मटर, वाटाण्याच्या शेंगांचे दाणे काढू द्या. त्याला जेवायला वाढू द्या. बालकाला सर्व कामे स्वत:च्या इच्छेनुसार व आपल्या पद्धतीने करू द्या.

ते बालकाला गतिमान मानतात. जे की कधी न थांबता अविरत, निरंतर शिकत राहते. बालदर्शनमध्ये ते लिहितात 'बालक क्षणाक्षणाला वाढणारा प्राणी आहे. बालकाची दृष्टी प्रश्नात्मक आहे. बालकाचे हृदय उद्‌गारात्मक आहे. बालकाच्या व्याकरणात प्रश्न आणि उद्‌गार आहेत. परंतु पूर्णविराम कुठेही नाही. बालक म्हणजे मूर्तिमंत गती, अल्पविरामसुद्धा नाही.'

गिज्जुभाई ज्येष्ठ मंडळींना बालकांच्याप्रति आत्मसुधाराचा सल्ला देतात. ते 'बालदर्शन' मध्ये म्हणतात. 'बालकाचा सन्मान याकरिता करावा की, 'आमच्यात आत्मसन्मानाची भावना जागृत होईल.

बालकाला रागावू नका, डाटू नका त्यामुळे ही वाईट सवय आमची निघून जाईल. बालकाला मारू नका, पिटू नका. अशा प्रकारे मारण्याची-पिटण्याची आमची जनावराची वृत्ती नष्ट होईल. अशा प्रकारे आम्ही स्वत:ला सुधारून आपल्या बालकांचा ख-या अर्थांनी विकास करू शकतो.

वातावरण :- गिज्जुभाई मानतात की, घरचे आणि विद्यालयातील वातावरण बालकासाठी स्वर्गासारखे असावे. ते म्हणतात 'मी तुम्हा आई-वडिलांना-शिक्षकांना विचारतो की, एका सकाळी तुम्ही उठलात आणि दैत्य, राक्षसाच्या दारात तुम्ही स्वत: उभे आहात. तेथे फार मोठे दरवाजे, खिडक्या, शिडी, पाय-या इतक्या उंचच उंच आहेत की, त्यावर चढणे कठीण आहे. भांडी-कुंडी फार मोठमोठी आहेत. गाद्या, तक्के, माणसापेक्षा दहा पट मोठे आहेत. बालक आम्हा मोठ्यांच्या संसारात रोज असेच अनुभव घेतात. जेथे सर्व वस्तू मोठ्यांच्या आवश्यकतेनुसार, त्यांना अनुकूल तयार केल्या जातात. येथे बालकाला दुर्लक्षितच केले जात नाही, तर असहाय्यही केले जाते. जेथे बालकाला प्रत्येक वस्तूसाठी मोठ्याकडे पाहावे लागते, की जे त्यांना आवडत नाही. चिडवणारे, डिवचणारे वाटते, आम्ही हमेशा प्रत्येक वस्तू मुलांच्या हातापासून लांब उंच ठेवतो. असे आपण का करतो, गिज्जुभाई 'बालक देवो भव' या मूलमंत्रावर विश्वास ठेवत. त्यामुळे ते विद्यालयाला बालमंदिरच्या रूपात पाहत होते. जेथे बालकाचे संपूर्ण ध्यान राखले जाईल. अशी त्यांची अपेक्षा होती.

ग्रंथालय : विद्यालयात ग्रंथालय असणे अत्यावश्यक आहे असे गिज्जुभाई मानत असत. त्यांच्यामते ग्रंथालय हे ज्ञानार्जनाचा मोठा भाग आहे. ते पाठ्यक्रमातील पाठ्यपुस्तकाला कमी महत्त्व देत. परंतु त्यापेक्षा कितीतरी जास्त महत्त्व ग्रंथालयातील इतर पुस्तकांना देत असत.

'दिवास्वप्न'मध्ये ते म्हणतात ' मी तर असे म्हणतो की, विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तके विकत घेऊ नयेत. तर त्या किमतीत त्यांनी चांगली-चांगली वाचनायोग्य पुस्तके विकत घ्यावीत. आणि वैयक्तिक ग्रंथालय बनवावे.

ते पुन्हा असेही म्हणतात की, वर्षाच्या शेवटी बालकांना आणि पालकांना वाटते की, पुस्तके आता आम्ही ग्रंथालयाला द्यावीत तर ते ग्रंथालय समृद्ध होईल. या ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाचा प्रयोग करण्याची संधी प्रत्येक बालकाला शिक्षकांच्या देखरेखीत मिळावी.

परीक्षा प्रणाली : परीक्षा प्रणालीबाबत गिज्जुभाई वेगळे विचार प्रतिपादित करतात. 'दिवास्वप्न' पुस्तकामध्ये त्यांनी परीक्षेबाबतीत स्पष्ट म्हटले आहे की, 'आज फक्त सहामाही आणि वार्षिक परीक्षा होतात. यापेक्षा मासिक परीक्षा घेणे सुरू करावे. यामुळे परीक्षेची भीती कमी होईल. दुसरे म्हणजे परीक्षा केवळ हुशार अध्ययनार्थी (विद्यार्थी) ची प्रगती मोजण्यासाठी नाही. तर सर्वसाधारण बालक (विद्यार्थी) आणि कमजोर बालकाला जागृत करण्यासाठी आहे. त्यांच्या कमजोरीची कमतरतेची चांगल्या प्रकारे माहिती करून घेऊन त्यावर उपचारात्मक अध्यापन करण्यासाठी असतात. तिसरी गोष्ट म्हणजे ज्या बालकाला माहिती आहे, विश्वास आहे की, आपणास विषय चांगल्याप्रकारे समजला आहे, त्याची जाणकारी आहे अशा विद्यार्थ्यांना परीक्षेपासून मुक्त ठेवावे. तसेच परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके पाहून उत्तरे देण्याचे, लिहिण्याचे स्वातंत्र्य असावे. गिज्जुभाई परीक्षकांना प्रशिक्षण देण्याबाबत 'दिवास्वप्न' पुस्तकात स्पष्टपणे सांगतात ' विद्यार्थ्यांची परीक्षा घेणा-या परीक्षकांचीही परीक्षा घेतली पाहिजे' त्यांचा उद्देश परीक्षा घेणे, माहिती घेणे, माहिती आहे की नाही ते पाहण्यासाठी होता.

धार्मिक शिक्षण : गिज्जुभाईंनी 'दिवास्वप्न' पुस्तकात धार्मिक शिक्षणासंदर्भात सुस्पष्ट म्हटले आहे की, 'माझ्यामते

तर छोट्या मुलांना धर्मोपदेशन करणे चांगले आहे. त्यांना तर त्या वेळी शरीर स्वस्थ, तंदुरुस्त, मनाची शुद्धता, निर्मळता, बुद्धी आणि कधीही न थकणा-या क्रियाशक्तीची आवश्यकता आहे. अशा प्रकारे त्यांना बलवान, सक्षम बनवण्याची गरज आहे. धार्मिक शिक्षणासंदर्भात ते पुढे असेही म्हणतात की, धर्म केवळ जिभेवर राहता कामा नाही. धर्म म्हणजे एक प्रकारची जागृती आहे. त्याचे अंत:करणापासून जगणेच उचित होय. ही भावना तेव्हाच जागी होते, जेव्हा माणसास त्याची भूक लागते. धर्म शिक्षणाच्या भुकेचीही एक वेळ असते. मात्र बालकावर तो अवेळी लादू नये.

धार्मिक शिक्षणाबाबत ते जरा स्पष्टच बोलतात ' मी तर असे म्हणतो की, आम्ही धर्मास जीवनात संस्कारित करून वर्तन बदलण्याचा प्रयत्न करावा'. आई-वडिलांनी प्रयत्न करावा शिक्षकांनी प्रयत्न करावा. पाठ्यपुस्तकात इतर कथेबरोबरच धार्मिक पुस्तके आणि प्रसंगावर आधारित कथासुद्धा देता येतील. बालकांसाठी सुरुवातीच्या वर्षासाठी इतकी धार्मिक शिक्षणाची तयारी पुरेशी आहे. कर्मकाण्ड आणि श्लोक पाठांतर, धर्मशिक्षण आणि धार्मिक पुस्तकांचे अध्ययन आम्ही भविष्यात करण्यासाठी ठेवावे.

अंतत : गिज्जुभाई हे आपल्या भारतातील सर्वपरिचित असे हाडाचे शिक्षक होते. पेशाने वकील असूनही त्यांनी स्वयंशिक्षण, स्वयंअध्ययन केले. विद्यालयाची स्थापना केली. स्वअनुभव, शिक्षण अनुभव एकत्रित संग्रहित करून आपल्या येणा-या पिढीसाठी ग्रंथबद्ध, शब्दबद्ध करून, ठेवले. ते मुलांच्या हृदयाची खोली समजून घेणारे, त्यांचे मापन करणारे पहिले भारतीय शिक्षणतज्ज्ञ होते. ते बालकांचे मित्र आणि हितचिंतक होते. तसेच त्यांच्या स्वातंत्र्याचे प्रबळ पाठीराखेही होते. विसाव्या शतकात तिस-या दशकातील रूढिग्रस्त परंपरावादी भारतीय समाजातील बालकांचा शिक्षणासंदर्भातील महिमा प्रतिष्ठित करणारे प्रमुख भारतीय होते. त्यांचे सर्व विचार आणि आचार वर्तमान युगातही तर्कसंगत आणि आधुनिक आहेत. सर्व शिक्षणप्रेमी अध्यापक आणि नागरिकांनी ते आत्मसात करणे अभिप्रेत आहे.

'भारतीय शिक्षण' मराठी मासिकाला दीर्घकाळ आर्थिक स्थिरता मिळावी या उद्देशाने स्थापन केलेल्या 'हितचिंतक निधी' या शाश्वत फंडासाठी स्वेच्छेने रक्कम रू.५०००/- जमा करण्याचे आग्रहाचे आवाहन करण्यात येत आहे. जनसेवा सहकारी बँक लिमिटेड चारकोप शाखा या ठिकाणी मंडळाचे खाते असून त्याचा क्रमांक - ००५०२२१००००२७०३ हा आहे. या खात्यात रक्कम जमा करून तसे आम्हाला लेखी कळवावे ही विनंती.